# कोवळ्या कळ्यांवरील ॲसिड हल्ले

**ॲसिड हल्ल्याच्या अमानुष घटनांना दरवर्षी जवळपास हजार तरुणी बळी पडतात. सहज उपलब्ध असणाऱ्या या शस्त्रावर काही प्रमाणात तरी निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यांची अंमलबजावणी मात्र झाली पाहिजे.**

दिल्लीच्या लक्ष्मीवर १५व्या वर्षी ॲसिड हल्ला झाला. तशी वेळ इतर मुलींवर येऊ नये म्हणून तिने सर्वोच्च न्यायालयात लढा दिला व प्रकरण धसाला लागले. धसाला लागले म्हणजे तब्बल सात वर्षांपासून सुरू असलेल्या खटल्यावर अखेर न्यायालयाने निकाल देताना कडक कारवाईचे निर्देश दिले. लक्ष्मीने दाखल केलेल्या याचिकेमुळे सरकारला या संबंधात पावले उचलणे भाग पडले आणि ॲसिड हल्ल्यासंबंधात भारतीय दंड संहितेत स्वतंत्र कलम जोडण्यात आले. राष्ट्रपतींनी त्याच्यावर स्वाक्षरी केली आणि संसदेने त्याला मंजुरीही दिली आहे. स्वच्छतेसाठी कोणत्याही किराणा दुकानात ॲसिड उपलब्ध असते व त्यामुळे हल्लेखोरांना विनासायास शस्त्र म्हणून त्याचा वापर करता येतो. लक्ष्मीच्या बाबतीत असेच झाले आणि १५व्या वर्षी कोवळ्या वयाच्या त्या किशोरीला विद्रुपतेला सामोरे जावे लागले. टॉयलेट क्लीनर म्हणून वापरल्या जाणाऱ्या ॲसिडचा त्याने या हल्ल्यासाठी वापर केला होता. या ॲसिडने चेहराच काय, त्या मुलीचा आत्माही जळून खाक होतो अशा शब्दात ॲसिड हल्ल्याची शिकार होणाऱ्या मुलींची व्यथा लक्ष्मीने व्यक्त केली आहे. खुल्या बाजारात ॲसिड विक्रीवर निर्बंध घालावेत या मागणीसाठी तिने २००६ मध्ये याचिका दाखल केली होती. न्या. लोढा व न्या. एस. जे. मुखोपाध्याय यांच्या पीठासमोर हा खटला चालून न्यायालयाने ताबडतोबीने त्यावर कारवाई करावी असे निर्देश दिले आहेत.

ॲसिडच्या खुल्या विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. ॲसिडची खरेदी व विक्री यासाठी कडक निर्बंध घालण्यात आले आहेत. ते तात्काळ लागूही करण्यात आले आहेत. शैक्षणिक संस्था, प्रयोगशाळा, रुग्णालये, उद्योग व इतर सरकारी विभाग, जेथे ॲसिडची आवश्यकता भासते, त्यांनी ॲसिडची खरेदी केली तर त्यासंबंधात त्यांना नोंद ठेवावी लागेल व त्याची प्रशासनाकडून नियमित तपासणी करून घ्यावी लागेल, निदान तसे नियम तरी करण्यात आले आहेत. महिलांवरील ॲसिड हल्ल्यांना पायबंद घालण्यासाठी हे नियम करण्यात आले आहेत. अर्थात घरगुती स्वच्छतेसाठी उपयोगी पडणाऱ्या ॲसिडशी या निर्बंधांचा काही संबंध नाही. त्वचेला न जाळणाऱ्या ॲसिड विक्रीला परवानगी आहे. महाधिवक्ता मोहन पारासरन यांनी १६ जुलै रोजी शपथपत्र दाखल करून सरकार ॲसिडला पॉयझन ॲक्टअंतर्गत विषाच्या श्रेणीत दाखल करीत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे ॲसिड खरेदीसाठी छायाचित्रासह ओळखपत्र आवश्यक ठरणार आहे. या खरेदीच्या वेळी खरेदी करणाऱ्याचा दूरध्वनी क्रमांक व ॲसिड खरेदी करण्याचे कारण याचीही नोंद करण्यात येणार आहे. १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या व्यक्तींना ॲसिड विक्री केली जाणार नाही. सल्फ्युरिक ॲसिड व नायट्रिक ॲसिड या दोन घातक रसायनांची विक्री देशात मोठ्या प्रमाणात होते. सल्फ्युरिक ॲसिड ३८ लाख टन तर नायट्रिक ॲसिड सव्वा तीन लाख टनाच्या घरात विकले जाते.

महिलांवरील एकतर्फी प्रेमसंबंध, कौटुंबिक कलह व अशा काही कारणांनी त्यांच्यावर ॲसिड हल्ले झाल्याच्या घटना कमी नाहीत. एकट्या दिल्लीत अशा ५६ हल्ल्यांची प्रकरणे नोंदली गेली आहेत. देशभराचा विचार केला तर अशा एक

हजाराहून अधिक घटना दर वर्षी घडतात. त्यातील बहुतेक म्हणजे ८०% महिला या हल्ल्यांच्या शिकार होतात, तर त्यातील ४०% मुली लक्ष्मीप्रमाणे १८ वर्षे वयाच्या आतील असतात, त्यांचे उभे आयुष्य जायचे असते. ही नोंद झालेल्या घटनांच्या अनुषंगाने मिळणारी आकडेवारी आहे. प्रत्यक्षात हजारामागे १५० घटनांची नोंद होत असावी असा निष्कर्ष काढण्यात आला आहे. त्यावरून ॲसिड हल्ल्याच्या घटना किती मोठ्या प्रमाणात होतात व त्यांची गांभीर्याने दखल घेण्याची गरज किती आहे याचे महत्व लक्षात यावे.

एखाद्या स्त्रीवर वा पुरुषावरही असा हल्ला झाला, तरी त्या व्यक्तीला अतोनात वेदनांना सामोरे जावे लागते. बहुतेक असे हल्ले स्त्रियांवर होत असल्याने त्यांचा विचार अधिक करण्याची गरज आहे. या प्रकरणातील आरोपी पकडले तर त्यांची रवानगी तुरुंगात होते. त्यांच्यावर दंड लावला जातो. तो किरकोळ असतो. दुसरीकडे हल्ल्याची शिकार झालेली व्यक्ती शारीरिक तसेच मानसिक छळाला सामोरी जाते. जखमींवर शस्त्रक्रिया करायची तर मोठा खर्च होतो. खटला उभा राहिल्यावर त्याला किती खर्च येईल व त्यासाठी किती वेळ जाईल ते वेगळेच. वानगीदाखल अशा काही खटल्यांचे उदाहरण देता येईल.  दिल्लीतील अशा एका प्रकरणात न्यायालयाने त्या आरोपीला केवळ १५ दिवसांची शिक्षा दिली. म्हणजे केवळ १५ दिवसात तो गुन्हेगार मोकाट सुटू शकला. दिल्लीतीलच एका अशा प्रकरणात गीता नावाच्या तरुणीवर तिच्याच समाजातील मेवालाल याने तेजाब फेकले. त्याला फक्त ३०० रुपये दंड झाला व १५ दिवसांच्या तुरुंगवासानंतर त्याची सुटका झाली. अशा तऱ्हेने जर आरोपींना मोकाट सुटण्याची संधी मिळत असेल तर त्या खटल्यांना व त्या शिक्षांनाही काही फारसा अर्थ नाही. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या काही घटनांतील एका घटनेचा उल्लेख करायचा तर घटस्फोटाला नकार देणाऱ्या पत्नीला पतीने जबरदस्तीने तेजाब पाजले. त्यामुळे तिचा त्याच दिवशी मृत्यू झाला. चेन्नईत एका पतीने पत्नीवर ॲसिडने हल्ला करून तिचा जीव घेतला. ती २४ दिवस मृत्यूशी झुंज देत होती या प्रकरणात मात्र तिच्या पतीला जन्मठेप होऊन २ हजार रु. दंड झाला.

असे अमानुष हल्ले फक्त आपल्या देशातच होतात असे नाही, तर ब्रिटनमध्येही एक मॉडेल व दूरचित्रवाणी कलाकार केटी पायपर हिला अशा हल्ल्याची शिकार व्हावे लागले. कडक कायद्याची मागणी होत राहिली व असे हल्लेही होत राहिले. बांगला देशातील अशा हल्ल्यातील नूरबानूला विश्वासघातकी पतीकडून अशा हल्ल्याला तोंड द्यावे लागले. सासूच्या दबावामुळे तिला सुटकेसाठी खोटे प्रतिज्ञापत्र द्यावे लागले व नंतरही त्याच्याचबरोबर राहावे लागले! बांगला देशने मात्र ॲसिड विक्रीवर निर्बंध घालणारा कायदा केला आहे. ॲसिड हल्ल्यातील आरोपीचा गुन्हा सिध्द झाला तर त्याला प्रसंगी मृत्युदंडही दिला जाऊ शकतो. या कडक कायद्यामुळे तेथे अशा हल्ल्यांना काही प्रमाणात प्रतिबंध बसला आहे. आपल्याकडेही ॲसिड हल्ले रोखण्यासाठी हा गुन्हा अजामीनपात्र करावा तसेच या हल्ल्यातील पीडितेला तीन लाखापर्यंत नुकसान भरपाई द्यावी असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

ॲसिडसंबंधात न्यायालयाने निर्देश दिल्याच्या घटनेपाठोपाठ मध्य प्रदेशातील गांधीनगर येथे एका विवाहित तरुणीने तिच्या प्रियकरासोबत राहण्यास नकार दिल्यानंतर तिच्यावर त्याने ॲसिड हल्ला केल्याची घटना घडली आहे. त्यामुळे केवळ कायदा करून काही परिणाम होईल असे नाही, त्याची कठोर अंमलबजावणी व्हावी लागेल व अशा घटनांना समाजानेही पायबंद घालावा अशी मानसिकता तयार करावी लागेल.

**मानसी मोकाशी**